# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते)

एम/पूर्व विभाग

## स्वारस्य अभिव्यक्ती

महानगरपालिका आयुक्त 'एम/पूर्व' विभागात "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" (वस्ती स्वच्छता योजना) राबविण्यासाठी इच्छुक व अर्हताप्राप्त अशासकीय संस्थांकडून अर्ज मागवित आहेत.

विषयांकित कामासाठी निवड करावयाच्या संस्थांच्या तसेच संस्थाच्या एककांच्या संख्येमध्ये विभाग कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार कोणतीही पूर्वसुचना न देता बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका राखुन ठेवित आहे.

**दिनांक**. 12.08.2022 **ते दिनांक**. 18.08.2022 या कालावधीत सार्वजनिक व साप्ताहीक सुटटी वगळता कार्यालयीन कामाच्या दिवशी सकाळी 10.30 ते दुपारी 05.00 वाजेपर्यंत **संस्थेने चलन मागणीकरीता स्वतंत्र अर्ज सादर केल्यानंतरच** संस्थेस चलन देण्यात येईल. चलन देण्याची अंतिम तारीख दि.18.08.2022 रोजी दुपारी 5.00 पर्यंत असेल. अर्जाची प्रत **'एम/पूर्व'** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु.800/- अधिक 18 टक्के GST रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **'बृहन्मुंबई महानगरपालिका'** (Municipal Corporation of Greater Mumbai) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर या कार्यालयातून अर्ज देण्यात येईल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक एम/पूर्व विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी **'एम/पूर्व'** विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेकडून 'एम/पूर्व' विभाग कार्यालयात अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख **दि**. 20.08.2022 **दुपारी** 01.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक अभियंता (घकव्य) एम/पूर्व